# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/03/2024 (सोमवार) सकाळ


## अवैध्यरीत्या गाई गौवंशाची वाहतुक करणाऱ्या आरोपीवर कायदेशिर कार्यवाही

दिनांक ०४/०३/२०२४ चे ०१/०० वाजता दरम्यान सहाय्यक पोलीस निरीक्षक राकेश साखरकर ठाणेदार पोलीस स्टेशन केळवद व त्यांच्या पोलीस स्टाफनि मुखबिरद्वारे मिळालेल्या खबरेवरुन पांढुर्णा कडुन नागपुरकडे जाणाऱ्या हायवे वरील मौजा बिहाडा फाटा येथे नाकाबंदी करीत असताना मिळालेल्या माहिती प्रमाणे A) इंडिका विस्टा कार क्र एम. एच–०२/ बी.पी.–३१२ व २) होंन्डा सिटी कार क्र एम. एच–१७ टी–०८१८ या दोन्ही कारच्या चालकांनी आपले ताब्यातील कार नाकाबंदीचे ठिकाणी न थांबविता यु टर्न (पलटवुन) पांढुर्णा हायवेने जागा, माळेगाव होत नांदागोमुख येथील जीवन बावणकर यांचे घरासमोरील डांबरी रोडवर आपले ताब्यातील वाहन सोडुन दोन्ही कार चालक हे अंधाराचा फायदा घेउन शेतातुन पळुन गेले सदर नमुद दोन्ही कारची पंचासमक्ष पाहणी केली असता इंडिका विस्टा कार क्र एम.एच–०२/बी.पी.–३१२ किंमती ४,००,०००/– रुपये व त्यातील १) ५ नग गाई/कालवड गौवंश प्रत्येकी किंमत १५,०००/– रुपये प्रमाणे किंमती ७५,०००/– रुपये २) होंन्डा सिटी कार क्र. एम. एच–१७/टी–०८१८ किंमती ४,००,०००/– रुपये ३) ६ नग गाई गौवंश प्रत्येकी किंमती १५,०००/– रुपये प्रमाणे किंमती ९०,०००/– रुपये असा एकुण ९,६५,०००/– रुपयाच्या गाई गौवंश जनावरांना अत्यंत क्रुर व निर्यदयतेने वाहनात डांबुन आखुड दोरीने पाय व तोंड बांधुन चारा पाण्याची सोय न करता दाटीवाटीने अपुऱ्या जागेत कोंबुन कत्तलीसाठी अवैद्यरित्या वाहतुक करतांना मिळुन आल्याने सदरचा मुद्देमाल जप्त करुन सदर गुन्हयातील १) इंडिका विस्टा कार क्र एम. एच–०२ बी.पी.–३१२ व २) होंन्डा सिटी कार क्र एम.एच–१७ टी–०८१८ चा चालक या दोन्ही इसमांविरुद्ध कलम ४२९, २७९, ३४ भादवी सहकलम ११(१)(घ) (ड) (च) प्राण्यांना निर्दयतेने वागविने प्रतिबंधक अधिनियम–१९६०, सहकलम–५ (अ), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ सहकलम– ११९ महाराष्ट्र पोलीस अधिनियम सहकलम–१८४ मो. वा. का अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीचा शोध सुरु आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), मा. श्री. अनिल मस्के उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर विभाग, सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक राकेश साखरकर ठाणेदार पो. स्टे केळवद, पोशि धोंडुतात्या देवकते, पोशि श्रीधर कुलकर्णी, पोशि पंकज शहारे यांनी केली आहे.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर